**निशाणी १७**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – कासाबाई चिंधू भांगरे, वय – ६७ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – खडकी खु.,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. फिर्यादी रंजना ही माझी मुलगी आहे. तिचे लग्न दादाभाऊ याचेसोबत २६ वर्षापुर्वी झाले होते. लग्नानंतर तिला सासरी पाच वर्ष चांगले नांदवले. त्यानंतर ते तिला सासुरवास करू लागले. आरोपी हा माझ्या मुलीस कर्ज फेडण्यासाठी पैसे आणण्यास सांगत होता. आम्ही त्याची समजूत घातली तरी काही फरक पडला नाही. त्यानंतर दादाभाऊ हा कचरे नावाच्या बाईसोबत निघून गेला. त्यानंतरही माझी मुलगी सासरी होती. तेथे तिला खुप त्रास दिला. त्यामुळे तिने फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता. मी आरोपीस ओळखते. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दादाभाऊने माझ्या मुलीस किती वर्ष कसे नांदवले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ याने माझेदेखत पैसे मागितले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज कोणाचे होते हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ हा कचरे नावाच्या बाईसोबत निघून गेला ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीस काय त्रास दिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुलीच्या प्रेमापोटी तिच्या सांगण्यावरून खोटा जबाब

**निशाणी १७**

देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.18 16:21:22 +0530

दिनांक १८.०४.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.